उच्च प्राथमिक स्तरावर भूगोल विषयात समाविष्ट जीवन कौशल्यांचा चिकित्सक अभ्यास

डॉ. साळुंके कविता
सहयोगी प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु विद्यापीठ नाशिक

लष्करी ज्योती
पीएच.डी संशोधक विद्यार्थी
य.च.म.मु विद्यापीठ नाशिक

सारांश

दैनंदिन जीवनात निर्माण होणा-या विविध समस्या आणि गरजांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठीची क्षमता विद्यार्थ्यात विकसित करणारे शिक्षण म्हणजे जीवन कौशल्ये शिक्षण होय.(जागतिक आरोग्य संघटना)

विद्यार्थ्यांना जीवनातील गरजा भागविण्यासाठी तसेच आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम करणे सकारात्मक वर्तनासाठी क्षमता विकसित करणे म्हणजे जीवन कौशल्यांचे शिक्षण होय.हे शिक्षण देण्यासाठी शालेय अभ्यासक्रमात जीवन कौशल्यांचा समावेश करण्यात आला केशव भांडारकर,सुनंदा लोहकर (शिक्षण समिक्ष २०१५) यांचा मते जीवन कौशल्ये असंख्य असू शकतात यांनी एकूण ८२ जीवन कौशल्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे.गोयल व गोयल यांनी देखील मानवी जीवनाला आवश्यक कौशल्यांची विभागणी ि१२ वर्गत केली आहे.तर जगभरातील झालेल्या विचारविनीमयानुसार W.H.O,UNEPA,UINCEF यांच्या सहकार्याने एक समुदायिक कार्यक्रम निश्चित करण्यात आला १९९७ मध्ये जीवन कौशल्ये शिक्षण या संकल्पनेचा उदय झाला.या असंख्य जीवन कौशल्यांमधून विद्यार्थी जीवनाला आवश्यक मूलभूत जीवन कौशल्यांची निवड करण्यात आली यात एकूण १० गाभाभूत जीवन कौशल्ये म्हणजे,स्व-जाणिव,समानानुभूती,समस्या निराकरण,निर्णयक्षमता,परिणामकारक संप्रेषण,सर्जनशील विचारप्रक्रिया,चिकित्सक विचारप्रक्रिया,व्यक्ती-व्यक्तीमधीलसंबंध,भावनांचे समायोजन,ताणतणावाचे समायोजन. या जीवन कौशल्यांचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करण्यात आला.शालेय विषयात या दहा जीवन कौशल्यांचा समावेश आढळतो का?भाषा विषयातून तर जीवन कौशल्यांची रुजविण्याची संधी शिक्षकांना मिळत पण सामाजिक शास्त्र सारख्या विषयांना जीवन कौशल्ये रूविण्यासाठी संधी मिळते का? ही दहा जीवन कौशल्ये भूगोल विषयातील आशयात देखील समाविष्ट करण्यात आलेली आहे का?या दहा जीवन कौशल्यांपैकी कोणत्या जीवन कौशल्यांची रुजवणूक भूगोल विषयाचा माध्यमातून केली जाते.अगदी कमी कालावधीत भूगोल शिक्षक ही जीवन कौशल्ये रूजविण्यासाठी किती प्रयत्न करतो.या संबंधीचा माहितीचा शोध घेण्यासाठी सर्वेक्षण या पध्दतीचा वापर करून मूलाखत तंत्राचा साहयाने ३० शिक्षकांची मूलाखत घेतली आहे.भूगोल विषयात जास्त वेळा आलेली जीवन कौशल्यांचा शोध घेण्यासाठी सर्व्हेक्षण या पध्दतीतील दस्ताऐवज या पध्दतीचा वापर करून इ.५ वी ते ८ वी पर्यंत पाठांचे विश्लेषण केले असता संशोधना अंती प्रत्येक जीवन कौशल्याची संख्या प्रत्येक पाठात किती प्रमाणात आहे हे निष्कर्षात मांडण्यात आले आहे.

प्रस्तावना

जीवन कौशल्ये शिक्षण म्हणजे जीवनोपयोगी शिक्षण होय.चार भिंतीच्या आतिल शिक्षणाचा विद्यार्थ्याला खुल्यापध्दतीने जीवन जगतांना उपयोग व्हावा या करिता जीवन कौशल्ये शिक्षण देणे आज काळाची गरज झाली आहे.विद्यार्थ्याला जीवन जगण्याचे कौशल्ये हे शाळेतून दिले जावे ही अपेक्षा आज समाजाची व शिक्षणव्यवस्थेची आहे.ि ही अपेक्षा पूर्ण करण्यासाठी शालेय अभ्यासक्रमात जीवन कौशल्यांचा समावेश करण्यात आला आहे.ज्या पध्दतीने एखादा कुशल कामगार मग तो सुतारकाम ,चर्मकाम अथवा विणकाम करणारा असो एकदा ते कार्य करणाचे कौशल्य त्या व्यक्तीला अवगत झाले तर ती व्यक्ती आयुष्यभर त्या कौशल्याच्या जोरावर प्रगती करत राहते अगदी त्याचप्रमाणे जर विद्यार्थ्याला जीवन जगण्याचे कौशल्ये शालेय अभ्यासक्रमातून व दैंनदिन अध्ययन अनुभवातुन दिल तर तो यशस्वी जीवन जगू शकतो तसेच जीवन कौशल्यांचा आधारे व्यक्ती अन्य कौशल्ये प्राप्त करून आपल्या जगण्यात सुसंगती आणू शकते.एक व्यक्ती म्हणून समाज व परिसराशी सकारात्मक साहचर्य संबंध प्रस्थापित करु शकते.आज मुलांना दैनंदिन जीवनात त्यांच्या कुवतीपेक्षाही जास्त मोठया गरजांना तोंड दयावे लागते.त्यांनी शैक्षणिक यशही मिळविले पहिजे.अभ्यासा व्यतिरिक्तच्या इतर अनेक उपक्रमांत उत्कृष्ट सहभाग घेऊन ,योगदान दिले पाहिजे.सहकार्य वृत्तीने काम केले पाहिजे.वैयक्तिक व सामाजिक विषयांवर जबाबदारपणे योग्य निर्णय घेतले पाहिजेत.विधायकपणे कुटुंब व समाजाला योगदान देणे,विभिन्न प्रकारच्या समाजाबरोबर परिणामकारकपणे सकारात्मक पध्दतीने आंतरक्रियेत सहभागी होता येणे आणि उत्पादक कार्यकुशल नागरिक निर्माण होण्यासाठी ज्ञान,कौशल्ये आणि मूल्ये आत्मसात करण्यासाठी जीवन कौशल्ये शिक्षण हे व्यक्तीला समक्ष करतात या विचाराने जागतिक आरोग्य संघटनेने १९९७ मध्ये जीवन कौशल्ये शिक्षणाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात असवा हे सुचविले.

जीवन कौशल्ये ही असख्य असू शकतात केशव भांडारकर व सुनंदा लोहकर(शिक्षण समिक्षा २०१५) यांचा मते जीवन कौशल्ये ही ८२ असून या यांची विभागणी प्रमुख दोन गटात करण्यात आली आहे १ मृदू जीवन कौशल्य २ दृढ जीवन कौशल्य,गोयल व गोयल यानी देखील (२०१४) मनुष्य जीवना करिता आवश्यक कौशल्यांची विभागणी १२ वर्गात केली आहे.स्वं विकास,सामाजिक कौशल्ये,जीवन कौशल्ये,तर्कशुध्द विचार क्षमता कौशल्ये,संशोधन कौशल्ये,रचनात्मक कौशल्ये,प्रणाली विचार कौशल्ये,माहितीयुग कौशल्ये,नेतृत्व प्रशासन आणि व्यवस्थापन कौशल्ये,आध्यात्मिक कौशल्ये,योग कौशल्ये,समग्र विकास कौशल्ये,अशी असंख्य कौशल्ये असून यातील मावनी जीवनासाठी आवश्यक कौशल्ये यांचा समावेश शालेय अभ्यासक्रम केला आहे. जगातील कोणत्याही देशातील नागरिकांनासाठी किमान कोणते शिक्षण असावे जेणेकरून त्यांचे जीवन संपन्न होईल या विचारातून W.H.O,UNEPA,UINCEF यांच्या सहकार्याने जगातील प्रत्येक देशातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठीचा एक सामुदायिक कार्यक्रम निश्चित करण्याचा १९९७ मध्ये प्रयत्न केला व त्यातूनच या कल्पनेचा उदय झाला.प्रत्येक व्यक्तीला जगण्यासाठी किमान कोणती कौशल्ये आवश्यक आहेत.हे निश्चित करण्यात आले व ही कौशल्ये प्रत्येक देशाने आपल्या शालेय शिक्षणातून विकसित करावी अशी अपेक्षा ठेवण्यात आली. जगभर घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचा सूक्ष्म अभ्यास करुन बालकांच्या व कुमारवयीन मुलाच्या निकोप वाढीसाठी जागतिक आरोग्य संघटनेने दहा गाभाभूत जीवन कौशल्यांची निवड केलेली आहे.ती जीवन कौशल्ये म्हणजे स्वःजाणीव,समानानुभूती,समस्या निराकरण,निर्णयक्षमता,परिणामकारक संप्रेषण,व्यक्ती-व्यक्तीमधील सहसंबंध,सर्जनशील विचार प्रक्रिया,चिकित्सक विचार,भावनांचे समायोजन,ताणतणावांचे समायोजन, त्यानुसार २००५ च्या आराखडयात जीवन कौशल्ये शालेय अभ्यासक्रमात असावी असा उल्लेख झाला, तर २०१० च्या अभ्यासक्रम आराखडयात जीवन कौशल्ये शिक्षण हे शालेय अभ्यासक्रमतून दिले जात असताना शिक्षकांची भूमिका काय असावी यावर विचार मांडण्यात आले राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० मसुदयात पृष्ठ क्र. १३ वर मुद्दा क्र. १, २, ३ मध्ये या संदर्भात जीवन कौशल्यांतून व्यक्तिमत्त्व विकास आणि मूल्यमापन या उपशीर्षकामध्ये जीवन कौशल्यांचे महत्त्व व गरज स्पष्ट केलेली आढळते.(राज्य अभ्याक्रम आराखडा २०१० पृष्ठ क्र. १३)

२.जीवन कौशल्यांची माहिती व अर्थ

२.१)'स्व' ची जाणिव स्वतःला पूर्णपणे ओळखणे म्हणजेच स्वतःची बल स्थाने,मर्यादा,इच्छा,आवडी -निवड,उणिवा इ.विषयी स्पष्ट जाणीव असणे,वेगळया शब्द सांगावयाचे झाले तर स्वतःला ओळखणे जाणून घेणे म्हणजे 'स्व' ची जाणिव होय

२.२)समानानुभूती एखादी व्यक्ती ,ती आपणाशी निगडित असो अथवा नसो तिच्या ठिकाणी आपण आहोत असे समजून तिच्या सुखदुःखाशी समरस होऊन तिला जाणून घेणे म्हणजे समानानुभूती होय.यातून आपण त्या व्यक्तीला समजून घेऊ शकतो.तिच्या समस्या आपल्यापेक्षा भिन्न असेल तरीही तिचा आपण स्वीकार करू शकतो.

२.३)समस्या निराकरण जेव्हा आपल्यासमोर समस्या येतात तेव्हा उपलब्ध असणा-या उपायापैकी योग्य उपाय निवडणे,कृती करणे.संपूर्ण समस्या सोडविण्याची सकारात्मक यश प्राप्त करण्यासाठी समर्थ बनविण्याची प्रक्रिया म्हणजे समस्या निराकरण कौशल्ये.

२.४)निर्णय क्षमता समस्येतून बाहेर पडण्यासाठी अनेक पर्यायांचा विचार करून समस्येचे पूर्णपणे निराकरण करण्यासाठी योग्य त्या पर्यायाची निवड करता येणे म्हणजे निर्णय क्षमता कौशल्ये होय.

२.५)परिणामकाराक संप्रेषण स्वतःच्या विचारांची शाब्दिक अथवा अशाब्दिक पध्दतीने प्रभावीपणे अभिव्यक्ती करता येणे म्हणजेच परिणामकारक संप्रेषण कौशल्य होय.

२.६)व्यक्ती-व्यक्ती मधील सहसंबंध दैनंदिन जीवनामध्ये ज्यांच्याशी नेहमी आपले संबंध असतात ते सर्वार्थाने निकोप ठेवण्याचे प्रयत्न म्हणजेच व्यक्ती व्यक्तींमधील संबंधाचे कौशल्ये होय.

२.७)सर्जनशील विचार रूढ पध्दतीपेक्षा वेगळया एखादया समस्येचा अथवा स्थितीचा विचार करण्यास प्रवृत्त होणे म्हणजे सर्जनशील विचार कौशल्ये होय.

२.८)चिकित्सक विचार माहितीचे किंवा अनुभवाचे स्वतःच्या क्षमतेनुसार वस्तूनिष्ठ स्वरूपात सुक्ष्मपणे विश्लेषण आणि परीक्षण करण्याची क्षमता म्हणजे चिकित्सक विचार कौशल्य होय.

२.९)भावनांचे समायोजन स्वतःच्या तसेच दुस-या व्यक्तीच्या भावना जाणून घेणे,त्या भावनांचा स्वतःच्या वर्तनावर होणारा परिणाम लक्षात घेऊन आवश्यकतेनूसार भावनांचे नियंत्रण किंवा व्यवस्थापन करणे म्हणजे भावनांचे समायोजन कौशल्ये होय.

२.१०)ताणतणावांचे समायोजन ताणतणावांच्या कारणांचा शोध घेणे,तसेच ताणतणावांचा शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेऊन त्यांचे व्यवस्थापन करणे म्हणजे ताणतणावांचे समायोजन कौशल्य होय.

३.जीवन कौशल्ये शिक्षणाचे शिक्षणातील महत्व

३.१) व्यक्तीमध्ये असलेल्या आंतरिक शक्ती व गुणवैशिष्टयांची जाणीव होण्यास मदत करणे व त्यानुसार आवश्यक तो बदल घडवून आणण्यास प्रेरित करणे या दृष्टीने शिक्षणात जीवन कौशल्यांचे महत्त्व आहे

३.२)दैनंदिन जीवनात येणा-या अडचणी व समस्यांवर विचापूर्वक निर्णय घेऊन योग्य मार्ग काढण्यास विद्याथ्याला समर्थ करणे

३.३) परिसरातील माहिती,ज्ञान,इतरांचे विचार इत्यादी व्यवस्थितपणे ग्रहण करून त्यानुसार स्वतःचे मत बनविण्सास,ते योग्य प्रकारे मांडण्यास आणि प्रभावी संवाद साधण्यास सक्षम करणे

३.४)परिस्थितीची जाणीव करून घेऊन योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे.

३.५)इतरांबददल व्देष,मत्सर,दूषित विचार न ठेवता त्यांच्याबददल आदर,प्रेम,समानानुभूती बाळगून समाजासाठी हितकरारक कृती करण्याची वृत्ती निर्माण होण्यास समर्थ करणे.

३.६)इतरांबददल दया,प्रेम,आदर,सदभावना बाळगून एकमेकांमधील वैयक्तिक व सामाजिक संबंध निकोप ठेवण्यास प्रवृत्त करणे.

३.७)परिसरातील घटना,कृती,प्रसंग इत्यादींबाबत सहजतेने व विचारपूर्वक निर्णय घेण्याची व ताणतणाव विरहित आनंदी जीवन जगता येण्याची क्षमता निर्माण करणे

३.८)आपल्या स्वतःच्या सुख दुःखप्रमाणे इतरांच्या सुख दुःखाच्या प्रसंगात सहभागी होण्यास प्रवृत्त करणे.

३.९)परिसरात घडलेली घटना/कृती कशा प्रकारे घडते याचा सखोल माहितीच्या आधारे विचार करून त्यावर तर्क व अनुमान काढून निष्कर्ष काढता येण्याची क्षमता विकसित करणे.

३.१०)एखादी कृती,विचार,पारंपरिक रीतीने मांडण्याऐवजी त्यात नाविन्य,सोपेपणा,आनंद निर्माण करून वेगळेपणाने मांडण्यास मदत करण्याची क्षमता विकसित करणे

४.उच्च प्राथमिक स्तरावरील जीवन कौशल्ये शिक्षणाचा वेध

जीवन कौशल्ये शिक्षण म्हणजे दैनंदिन जीवनातील गरजा आणि आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला क्षमता संपन्न करण्या-या सामाजिक - मानसिक क्षमता म्हणजेच जीवन कौशल्य क्षमता आहेत.या क्षमतांचा विकास करण्यासाठी जीवन कौशल्य शिक्षणाचा समावेश २००५ नंतर शालेय अभ्यासक्रमात करण्यात आला.

ज्ञानरचनावादी दृष्टीकोनातून अध्ययन अध्यापन करतांना जीवन कौशल्यांचे शिक्षण देणे अधिक सोप होऊ शकते त्यासाठी योग्य पध्दतीने विचार करण्यासाठी त्या विचारांना व्यवहारोपयोगी बाबींची जोड दयावी.दैनंदिन अनुभव विचारात घेऊन त्यांचा आपल्या जीवनांशी संबंध जोडावा. जीवन कौशल्य शिक्षणाच्या माध्यमातून जीवन आणि शिक्षणा यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला तरच शिक्षण हे जीवनोपयोगी होईल.यादृष्टीने प्राथमिक,उच्च प्राथमिक स्तरावर प्रयत्न ही केले जातात.शालेय स्तरावरील सर्व विषयांमध्ये जीवन कौशल्यांचा समावेश केलेला आढळतो.प्रत्येक शिक्षक आप-आपल्या विषयानूसार विविध कृतिकार्यक्रमाचा माध्यमातून,विविध अध्ययन अनुभूतीचा माध्यमातून जीवन कौशल्यांचे शिक्षण देतांना दिसतात. काही ठिकाणी शाळा देखील जीवन कौशल्यांचे शिक्षण देण्यासाठी शिक्षकानां आवश्यक सोयी उपलब्ध करून देते जसे विद्यार्थी संख्ये नुसार क्रीडांगण,ग्रंथालय व प्रयोगशाळेची सोय,शाळेतील शिक्षकांना जीवन कौशल्ये शिक्षणाचे प्रशिक्षण देण्यासाठी कार्यशाळांना पाठवते,जीवन कौशल्ये शिक्षण प्रशिक्षण साहित्य उपलब्ध करून देते.तज्ञांची व्याख्यान कृतिसत्रे,समुपदेशकाची नेमणूक ,शाळा,पालक शिक्षक व विद्यार्थी या मध्ये सुसंवाद घडण्यासाठी सभा घेते,शैक्षणिक सहल,गिर्याहरण,समाजसेवा शिबिरे सामाजिक संस्थांना भेटी,विविध उपक्रमाचे आयोजन,व्यसनांचे परिणाम,एच.आय.व्ही./एडस,विविध साथीचे रोग आणि अनारोग्य टाळून चांगला सामाजिक आरोग्यासाठी विविध माहितीपट आणि लघुपट यांच्या माध्यमांतून तसेच प्रदर्शन भरवून विद्यार्थ्यांना माहिती दिली जाते

.वरील पध्दतीचे कार्य काही ठरावीक शाळेतच केले जाते.विविध विषयातून ही जीवन कौशल्ये रुजविता यावी यासाठी शिक्षक विविध अध्ययन - अनुभूतीचा वापर करतो, आतापर्यंत झालेल्या संशोधनाच्या निष्कर्षावरून असे लक्षात येते की काही ठिकाणी ३० % शिक्षक जीवन कौशल्ये रुजविण्याचा प्रयत्न करतात. ६०% शिक्षक प्रभावीरित्या प्रयत्न करत नाही, तर २० % शिक्षकांना जीवन कौशल्यांविषयी सखोल माहिती नाही. यावर आधारित प्रभावी असे शासनाकडून प्रशिक्षण कार्यक्रमदेखील झालेले नाहीत, प्रशिक्षण झाले ते सर्व विषयांचे एकत्रित घेतले जातात.म्हणून शिक्षकाला अध्ययन अध्यापनातून जीवन कौशल्ये रुजविण्यात अडचणी येतात.म्हणून प्रत्येक विषयाचे स्वतंत्र व जास्त कालावधीचे प्रशिक्षण होणे आवश्यक आहे हे शिक्षकांचा मूलाखती वरुन लक्षात येते.

६.प्राथमिक स्तरावर केलेले संशोधन

६.१)समस्या विषय

उच्च प्राथमिक स्तरावर भूगोल विषयात समाविष्ठ जीवन कौशल्यांचा चिकित्सक अभ्यास

६.२)उद्दिष्टे

१.उच्च प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमात समाविष्ट जीवन कौशल्यांची चिकित्सा करणे

२.भूगोल विषयात समाविष्ट जीवन कौशल्यांचा अभ्यास करणे.

६.३)गृहीतके

१) उच्च प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमात जीवन कौशल्यांचा समावेश आहे.

२) शिक्षक अध्यापन करताना जीवन कौशल्ये रुजवण्याचा प्रयत्न करतात.

६.४)संशोधन प्रश्न

१.प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमात कोणत्या जीवन कौशल्यांचा समावेश आहे याचा शोध घेणे.

२.उच्च प्राथमिक स्तरावर भूगोल विषयात समाविष्ट जीवन कौशल्यांचा शोध घेणे.

६.५)संशोधनाची कार्यपध्दती सदर अभ्यासाठी भूगोल विषयातील पाठयपुस्तकातील जीवन कौशल्यांची चिकित्सा करण्यासाठी सर्व्हेक्षण दस्तऐवज विश्लेषण ही पध्दत वापरण्यात आली.उच्च प्राथमिक स्तरावर अध्यापन करणा-या शिक्षकाना जीवन कौशल्याची किती माहिती आहे याचा शोध घेण्यासाठी नमूना म्हणून उच्च प्राथमिक स्तरावर अध्यापन करणा-या ३० शिक्षकाची निवड केली मुलाखत घेण्यासाठी मुलाखत या तंत्राचा वापर करण्यात आला.

६.६)निष्कर्ष

*उच्च प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमात सर्व जीवन कौशल्यांचा समावेश आहे.

*उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयात सर्व जीवन कौशल्यांचा समावेश आढळतो.

*उच्च प्राथमिक स्तरावरील ८०% भूगोल शिक्षकांना जीवन कौशल्या विषया माहिती आहे.

*उच्च प्राथमिक स्तरावर भूगोल विषयाच्या पाठयपुस्तकाची चिकित्सा केली असतो खालील प्रमाणे जीवन कौशल्याचा समावेश दिसून येतो.

वर्ग	स्व जाणिव	समानानुभूती	समस्या निराकरण	निर्णयक्षमता	परिणाम कारक संप्रेषण	व्यक्ती-व्यक्तीमधील सहसंबंध	सर्जनशीलत विचार	चिकित्सक विचार	भावनांचे समायोजन	ताणतणावांचे समायोजन
इ.५ वी	~~IIII~~ ~~IIII~~ IIII IIII	~~IIII~~ IIII IIII	~~IIII~~	~~IIII~~ IIII ~~IIII~~ IIII	~~IIII~~ IIII ~~IIII~~ III	~~IIII~~ III	~~IIII~~ III	~~IIII~~ IIII ~~IIII~~ IIII	~~IIII~~ II	IIII
इ.६ वी	~~IIII~~ III	~~IIII~~ ~~IIII~~	~~IIII~~ ~~IIII~~	~~IIII~~ II	~~IIII~~ IIII ~~IIII~~ ~~IIII~~	~~IIII~~ IIII I	~~IIII~~ IIII	~~IIII~~ ~~IIII~~ ~~IIII~~ IIII	~~IIII~~ IIII	I
इ.७ वी	IIII	~~IIII~~	~~IIII~~ II	~~IIII~~ I	~~IIII~~ IIII ~~IIII~~ I	~~IIII~~ IIII	~~IIII~~ IIII	~~IIII~~ IIII ~~IIII~~ II	~~IIII~~ IIII	I
इ.८ वी	III	~~IIII~~	~~IIII~~ I	~~IIII~~	~~IIII~~ IIII ~~IIII~~ IIII	~~IIII~~ III	~~IIII~~ IIII I	~~IIII~~ IIII ~~IIII~~ IIII	~~IIII~~ II	००
एकुण संख्या	३४	३५	२८	३८	~~७२~~	३६	३७	~~७४~~	३४	६

वरील तक्त्याचे निरिक्षण केले असता असे लक्षात येते इ.५ वी ते ८ वी पर्यत सर्व जीवन कौशल्यांचा समावेश भूगोल विषयाचा पाठयक्रमात आढळतो.मात्र पाठांची संख्या लक्षात घेता वर्ग नुसार जीवन कौशल्यांचे प्रमाण कमी जास्त झालेले आढळते. या जीवन कौशल्यांचा समावेश करीत असतांना विद्यार्थ्यांचा वयानुसार व मानसशास्त्राचा कदाचित विचार केलेला असावा. इयत्ते नुसार विश्लेषण केले असता

* इ.५ वी भूगोल विषयात एकुण पाठांची संख्या २५ असून यात सर्व जीवन कौशल्या पैकी १९ पाठात ७६% स्व जाणिव, २०पाठात ८०% निर्णय क्षमता,१९ पाठात ७६% चिकित्सक विचार प्रक्रिया तर १८पाठात ७२% परिणामकारक संप्रेषण या जीवन कौशल्यांवर भर दिलेला दिसून येतो.

* इ.६ वी भूगोल विषयात पाठांची संख्या १९ असून यात १९पाठात १००% परिणामकारक संप्रेषण,१९पाठात १००% चिकित्सक विचार प्रक्रिया,११पाठात ५७% व्यक्ती -व्यक्ती मधील संबंध,१०पाठात५०.२६% भावनांचे समायोजन,समस्या निराकरण व समानानुभूती या जीवन कौशल्यांवर भर दिलेला आढळतो.

*इ.७ वी च्या भूगोल विषयातील पाठयपुस्तकात पाठांचीसंख्या १८ असून यात १६पाठात८८.८०% परिणामकारक संप्रेषण,१७पाठात ९४.३५ चिकित्सक विचार प्रक्रिया व १०पाठात ५०.५५% भावनांचे समायोजन या जीवन कौशल्यांवर अधिक भर दिलेला दिसून येतो.

* इ.८ वी च्या भूगोल विषयातील पाठयपुस्तकातील पाठांची संख्या १९ असून यात १९पाठात १००% परिणामकारक संप्रेषण व चिकित्सक विचारप्रक्रियेचा समावेश आहे.११ पाठात ५७.८६% सर्जनशील विचारप्रक्रिया या जीवन कौशल्यावर अधिक विचार केलेला आढळतो.

* एकंदरीत सर्व जीवन कौशल्ये व इ.५ वी ते ८ वी पर्यत भूगोल विषय विश्लेषणाचा विचार केला असता असे लक्षात येते भूगोल विषयातून मोठया प्रमाणात रूजविता येणारी जीवन कौशल्ये म्हणजे चिकित्सक विचार प्रक्रिया ८१ पाठांपैकी ७४ पाठात ९१.२%, परिणामकारक संप्रेषण ७२ पाठात ८८.५६% ,निर्णय क्षमता ३८पाठात ४६.७४% तर सर्जनशील विचार प्रक्रिया ही ३७ पाठात ४५.५१ पाठात दिसून येते. भूगोल विषयाचा सायन्स विषयात समावेश केलेला असल्याने वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणारे जीवन कौशल्यांचा समावेश भूगोल विषयात करण्यात आलेला असावा.

७.)उच्च प्राथमिक स्तरावर अध्यापनकरतांना जीवन कौशल्ये शिक्षणाची उपयुक्तता

७.१)परिपूर्ण व्यक्ति विकास

सकारात्मक जीवन जगण्यासाठी तसेच वैयक्तिक विकास कामाला प्राधान्य,प्रोत्साहन देण्यासाठी आत्मभान आणि आत्मविश्वास यांच्या साहाय्याने व्यक्ती स्वत:चे सामर्थ्य आणि कमतरता समजावून घेऊ शकते.आयुष्यातील संधी आळखून धोक्यांना सामारे जाण्याची तयारी करू शकते.या दृष्टीने जीवन कौशल्ये शिक्षणाची उपयुक्तता आहे.

७.२)आंतरव्यक्तिगत कौशल्यांमधून समूहविकास

आंतरव्यक्तिगत कौशल्यामुळे व्यक्ती स्वत:च्या जीवनात,कुटूंबात आणि समाजात निर्माण होणा-या समस्या ओळखून त्यांना यशस्वीपणे सामोरी जाऊ शकते.

७.३)सामाजिक विकास

जीवन कौशल्यांच्या साहाय्याने सामाजिक प्रश्न सोडविताना व्यक्ती विविध पर्यायांचा आणि फायदया - तोटयांचा विचार करते.या सर्वांचा परिणाम म्हणजे चांगले आंतरव्यक्तिगत संबंध निर्माण होऊन सामाजिक विकास साधण्यास मदत होते.त्यामुळे सकारात्मक नातेसंबंध निर्माण होऊन समुहात,गटाबरोबर कार्य करण्यासाठी खूप फायदेशीर ठरतात.शिक्षकांना शिक्षणव्यवहार करताना ही कौशल्ये खूपच उपयुक्त आहे.

७.४) पर्यावरणीय कौशल्यांचा विकास

जागतिकीकरणामुळे नवे तंत्रज्ञान आणि नवी जीवनशैली स्वीकारली त्यामुळे पर्यावरणाचा विनाश होत आहे.मुलांना पर्यावरणाचा विनाश होत आहे.मुलांना पर्यावरण व त्याचे रक्षण यांविषयी जीवन कौशल्य संवेदनशील बनवितात.मानवी अस्तित्वासाठी,वाढीसाठी आणि विकासासाठी तसेच पर्यावरणीय अरिष्टाला सामारे जाण्यासाठी आणि मानवी जीवनाशी जुळवून घेण्यासाठी जीवन कौशल्ये मार्गदर्शन करतात म्हणून जीवन कौशल्यांचे शिक्षण हे उपयुक्त ठरते.

७.५) सामाजिक आरोग्याचा विकास

जीवन कौशल्यांतून अशा कही ठरावीक आरोग्य आणि सकारात्मक कौशल्यांचा समावेश होतो.की,त्यामुळे मुलांना व्यसनांपासून व इतर धोक्यांपासून वाचण्याची प्रेरणा मिळते.अभ्यासक्रमातून वैयक्तिक,सामाजिक आणि राष्ट्रीय विकास साधण्यासाठी जीवन कौशल्ये उपयुक्त ठरतात.

सारांश

उच्च प्राथमिक स्तरावर भूगोल विषयाच्या पाठांची चिकित्सा केली असता.विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निमार्ण व्हावा या हेतूने चिकित्सक विचार प्रक्रिया,सर्जनशील विचार प्रक्रिया,आपले मत विद्यार्थ्याला प्रभावी रित्या मांडता यावे या करीता प्रभावी संप्रेषण प्रक्रिया,योग्य वेळी योग्य निर्णय घेता यावा या निर्णय क्षमतेचे विकास करणारा आशय यात दिलेला आहे.जीवन कौशल्यांची रचना ही सांस्कृतिक आणि समाजिक विकसनासाठी आवश्यक कौशल्यांची अंमलबजावणी सहजतेने होण्यासाठी सुयोग्य केलेली आढळते.वैयक्तिक आणि सामाजिक विकासात हातभार लावण्याचा एक प्रयत्न होत असतानाच आरोग्य आणि सामाजिक समस्यांचा प्रतिबंध व मानवी हक्काचे जतन करता येणार आहे.विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास करता येणार आहे म्हणून राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ नंतर च्या अभ्यासक्रमात जीवन कौशल्यांचा समावेश करण्यात आला आहे.व तेव्हा पासूनच प्रत्येक शाळेत विविध विषयांचा माध्यमातून जीवन कौशल्ये रुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे.व S.C.E.R.T यानी जीवन कौशल्य शिक्षणावर आधारित कृतिक्रम घेतले,शिक्षण संस्था यशदा मार्फत देखील काही प्रमाणात प्राथमिक स्तरावर जीवन कौशल्य शिक्षणावर आधारित काही प्रशिक्षण घेतले जातात.मात्र शिक्षकांचा मूलाखती वरून लक्षात येते की हे कार्यक्रम पुरेसे नाही.अधिक कालावधीचे व प्रत्येक एक विषयाचे स्वतंत्र जीवन कौशल्ये शिक्षणाचे प्रशिक्षण घेण्यात यावे.सामाजिकशास्त्रा सारख्या विषयांना वर्षभरातील तासिका कमी असल्याने प्रभावी उपक्रम पण घेता येत नाही.व कृतिकार्यक्रम तयार करण्याचे प्रशिक्षण अपूरे पडते.यामुळे जीवन कौशल्ये रुजवितांना अनेक अडचणी येतात.मित्रहो यासाठी गरज आहे जीवन कौशल्यांवरील संशोधनाची आणि शिक्षण प्रशिक्षणातही हा विषय समाविष्ट करण्याची.

संदर्भग्रंथ सूची

i. आगलावे पी.,(२०००):,'संशोधन पध्दती व तंत्रे',विद्या प्रकाशन, नागपूर.
ii. भांडारकर पु.ल.,(१९९९):,'सामाजिक संशोधन पद्धती,'महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, औरंगाबाद.
iii. भिंताडे वि.रा.,(२००६):,'शैक्षणिक संशोधन पद्धती,' नित्यनूतन प्रकाशन, पुणे.
iv. मुळे रा.श.आणि उमाठे वि.तु.,(१९८७):,'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर.
v. जगताप ह.ना.(२००६):,'शैक्षणिक संशोधन पद्धती,'नूतन प्रकाशन,पुणे.
vi. बोरुडे रा.र.,(२००८):,संशोधन पद्धतीशास्त्रातील,' पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.
vii. पंडित बी.बी.,(२००५):,' शिक्षणातील संशोधन,' नूतन प्रकाशन, पूणे.
viii. यंशवतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, (२०१५),' संशोधन मार्गदर्शक मालिका.'य.च.म.मु.वि.नाशिक.
ix. संगोलकर अरुण.,(२०११):,'नवीन जागतिक समाजातील नवविचार प्रवाह,'इनसाईट पब्लिकेशन,नाशिक.
x. कुलकर्णी शालीनी.,(२००९):,'मूल्यशिक्षणदृष्टी उपक्रम,' सुयोग प्रकाशन, `
xi. कुलकर्णी वि.रा.,(१९८०) :,'शैक्षणिक संशोधन पद्धती,'नित्यनुतन प्रकाशन ,पुणे.
xii. मूल्य व जीवन शिक्षण उपक्रम शतक महोत्सवी वर्ष, (२०१४):, मराठा विद्या प्रसारक समाज,नाशिक
xiii. चित्ते हेमंत., (२०१५):,'शैक्षणिक संशोधन मांडणी व दिशा,'सात्विक प्रकाशन,नाशिक.
xiv. मोरे निकेत,(२००८):,' शिक्षक व्यवसायामध्ये जीवनावशक कौशल्याचे महत्त्व एक अभ्यास.'शिक्षण समिक्षा.
xv. खोडवे ज्ञानेश्वर,(२००८):,'इ.५ वीच्या मराठी (प्रथम भाषा) या पाठयपुस्तकातील जीवन कौशल्यांचे अध्यापन शास्त्रीय विश्लेषण,' शिक्षण समिक्षा.
xvi. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५.'
xvii. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,'राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१०,'
xviii. **महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे – ३० (विद्या परिषद),(२०११) :,ङ जीवन कौशल्ये शिक्षण मार्गदर्शिका जीवन कौशल्ये नमुना पाठ भाग १ ,ङपुणे.**

xix. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे – ३० (विद्या परिषद),(२०११) :,ङ जीवन कौशल्ये शिक्षण मार्गदर्शिका अध्ययन अध्यापन पद्धती आणि मूल्यमापन भाग २ ,'पुणे.
xx. वास्कार पुष्पा.,(२०१३):,'दैनंदिन भाषा अध्यापनातून जीवन कौशल्यांची रुजवणूक,' शिक्षण समिक्षा.
xxi. राजपूत कुलदिपसिंह.,(२०१३):,' दैंनदिन भूगोल अध्यापनातून जीवन कौशल्यांची रुजवणूक,' शिक्षण समिक्षा
xxii. Bhavaneswane Lakshmi, (२००९):,'Life Skill Education,' University News
xxiii. Meena.(२०१०):,'The Need for Life Skills Cented Education Via Life Skills Paradigm,' University News.
xxiv. Swamy Raju (२०११) Life skill Education:Ruby in The crown of Human Development,'University news.
xxv. Best,John,J.W.,Research in Education,' Prentic Hall of India Private Limited,New Deihi.
xxvi. Jhon W.creswell.,(२००९):,ङResearch Design,ङSAGF pulication pvt.Ltd,(Third Edition)New Delhi.
xxvii. Jhon W.creswell.,(२०१२):,ङEducation Research,ङpeorson Education,ङicn,Boston,U.S.A.(fourthEdition).